BDD - 89
उपमुख्य अभियंता बी. डी. डी. इमारत पुनर्विकास कार्यान्वयन कक्ष मुंबई मंडळ ........ 08/03/18

महाराष्ट्र शासन

क्र. विविचा - २०१६ /प्र.क्र. २६१ /गृनिप
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल :-gnp.housing@maharashtra.gov.in
दिनांक : ०३ मार्च, २०१८.

म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण
आवक क्र. 796
दिनांक 6 MAR 2018
स्वीकारणाऱ्याची सही

प्रति,

मुं. गृ. नि. व क्षे. वि. मंडळ NR-60 7/3/18

१) अपर मुख्य सचिव,
गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२) प्रधान सचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

३) प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

४) प्रधान सचिव (कामगार),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

५) प्रधान सचिव,
समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

६) महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

७) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण ,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

८) संचालक,
मुंबई विकास विभाग चाळ,
सावली इमारत, गणपत जाधव मार्ग,
मुंबई - ४०० ०१८.

विषय :- बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी पात्रेच्या प्रश्नासंदर्भात व इतर विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२९.०१.२०१८ रोजी झालेली बैठक.

Dy. CE (BDD)

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२९.०१.२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांचे दि.२३.०१.२०१८ रोजीचे पत्र सहपत्रांसह सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

ers.docx

तरी, सदर इतिवृत्तात नमुद मुद्द्यांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) अपर मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई -३२.
२) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
३) मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
४) मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
५) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई -३२.
६) उप सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई -३२.
७) निवडनस्ती (गृनिप).

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९.०१.२०१८ रोजी झालेल्या, बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी पात्रतेच्या प्रश्नासंदर्भात व इतर विषयांबाबतच्या बैठकीचे इतिवृत्त.

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी पात्रतेच्या प्रश्नासंदर्भात व इतर विषयांबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९.०१.२०१८ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस खालीलप्रमाणे लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

१. मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
३. अपर मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय
४. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग
५. अपर मुख्य सचिव, गृह विभाग
६. प्रधान सचिव, कामगार विभाग
७. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
८. सह सचिव, गृहनिर्माण विभाग
९. सह सचिव, कामगार विभाग
१०. उपायुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई
११. संचालक, बी.डी.डी. चाळ
१२. व्यवस्थापक, बी.डी.डी. चाळ

सदर बैठकीमध्ये उपस्थित करण्यात आलेले मुद्दे व त्या अनुषंगाने देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दा | मा. मुख्यमंत्री यांचे निदेश | संबंधित विभाग | अंमलबजावणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | संचालक / व्यवस्थापक बी.डी.डी. चाळ यांनी दि. ११.१०.१९९४ च्या शासन निर्णयात नमुद कालावधीनंतर त्यांना नियमितीकरणाचे अधिकार नसताना तसेच सदर शासन निर्णयातील तरतुदींना डावलुन हस्तांतरण/नियमितीकरण केल्याचे तसेच असे करताना संचालक कार्यालयाकडून भ्रष्टाचार झाल्याची तक्रार आहे. सबब, ही प्रकरणे गृहविभागाकडे पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आलेली आहेत.<br>या मधील काही प्रकरणी सन १९९४ च्या शासन निर्णयाचा आधार | सदर अनियमिततेस जबाबदार संचालक / व्यवस्थापक, बी.डी.डी. चाळी यांच्यावर अनियमिततेबाबत/ भ्रष्टाचाराबाबत तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन चौकशी करुन पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी. | गृह विभाग | ---- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | घेण्यासाठी दि.०१.०५.१९९२ पूर्वीपासूनचे बोगस पुरावे सादर करुन सदर भाडेदारी नियमितीकरण झाल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. | | | |
| २. | शासनाच्या दि. ११.१०.१९९४ च्या शासन निर्णयात नमुद कालावधीनंतर तसेच सदर शासन निर्णयात तरतुद नसतांनाही झालेली अनधिकृत हस्तांतरणे (वारसाहक्क व नातेवाईक तसेच शासन/मा. न्यायालयाने विशिष्ट प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार झालेली हस्तांतरण प्रकरणे वगळता) व त्या अनुषंगाने संचालक/व्यवस्थापक, बी.डी.डी. चाळ यांनी त्यांना नियमितीकरणाचे अधिकार नसताना तसेच सदर शासन निर्णयातील तरतुदींना डावलुन निर्गमित केलेले हस्तांतरण/ नियमितीकरण आदेश व अशा रहिवाश्यांच्या पात्रतेसंदर्भात. | शासन निर्णय दि.११.१०.१९९४ मध्ये तरतुदी नसतांना दि.१२.१२.१९९४ ते दि.२८.०६.२०१७ या कालावधीत झालेल्या अनधिकृत हस्तांतरण (Transfer) प्रकरणामध्ये (वारसाहक्क व नातेवाईक तसेच शासन/मा. न्यायालयाने विशिष्ट प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार झालेली हस्तांतरण प्रकरणे वगळता) संबंधित गाळ्यातील सध्याच्या भाडेकरुकडुन दंडात्मक शुल्क वसुल करण्यात यावे व अशा भाडेकरुंची पात्रता सदर दंडात्मक शुल्क भरल्याची पावती, सध्याच्या वास्तव्याचा पुरावा व नियमितीकरण आदेश / भाडेदारी करारनामा यांच्या आधारे निश्चित करण्यात यावी. | गृहनिर्माण विभाग | तातडीने |
| ३. | बी.डी.डी. चाळींच्या जमिनीवर गृह विभागाच्या ताब्यात असलेल्या व पोलिस निवासस्थाने म्हणुन वितरीत करण्यात आलेल्या सुमारे २९०० गाळ्यांबाबत. | बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाने आवश्यक संक्रमण गाळे गृह विभागास हस्तांतरीत करावे व गृह विभागाने बीडीडी चाळीतील गाळे रिक्त करुन म्हाडाच्या ताब्यात पुनर्विकासासाठी द्यावेत. पुनर्विकास पुर्ण झाल्यानंतर म्हाडाने पुनर्वसित गाळे (पोलिसांच्या सेवासदनिका इतके) गृह विभागास हस्तांतरीत करावे व गृह विभागातर्फे पुनर्वसन गाळ्यांचे वितरण करण्यात यावे. पुनर्वसन गाळे वितरीत करणे प्रकरणी गृह विभागाने नियमावली/पात्रतेचे निकष निश्चित करावेत. | गृह विभाग व म्हाडा | ---- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | बी.डी.डी.चाळींच्या पहिल्या टप्प्यातील पुनर्विकासांतर्गत गृह विभाग, कामगार कल्याण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग इ. शासकिय व निमशासकिय यांच्या ताब्यातील गाळे / बांधकाम तात्काळ हस्तांतरीत करणे. | प्रकल्प कालावधीत म्हाडाने या विभागांना संक्रमण गाळे उपलब्ध करून दिले आहेत. त्या विभागाने देण्यात आलेल्या संक्रमण गाळयामध्ये स्थलांतर करून बीडीडी चाळीतील गाळे /बांधकामे रिक्त करून म्हाडास पुनर्विकासासाठी सुपुर्त करण्यात यावे. | संबंधित विभाग | १५ दिवस |
| ५. | दि.२३.०१.२०१८ च्या पत्रान्वये उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबतचे नमुद केलेले इतर मुद्दे. | संबंधित विभागांनी उचित कार्यवाही करावी. | संबंधित विभाग | तातडीने |

*************************************************